## मंजुनाथ नगरात रिक्षात गॅस भरणाऱ्यावर गुन्हा

✔ **सोलापूर :** मंजुनाथ नगर, लिमयेवाडी येथे घरगुती गॅसचा वापर इंधन म्हणून भरताना पोलिसांनी धाड टाकली. व एक रिक्षा, गॅसच्या दोन टाक्या, इलेक्ट्रिक मोटार, इलेक्ट्रिक वजनकाटा, पाण्याची मोटार असा ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी हरिदास शंकर गायकवाड वय ५२ रा. मंजुनाथ नगर, लिमयेवाडी याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी फौजदार सुरज कुतवळ यांनी सलगरवस्ती पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आह. पोलिसांनी एमएच १३-सीटी ७७४५ या क्रमांकाची ६० हजार रूपये किंमतीची रिक्षा, दोन गॅस टाक्या, एक इलेक्ट्रिक मोटार, एक इलेक्ट्रिक वजन काटा, एक पाण्याची इलेक्ट्रिक मोटार असा ७३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. तपास पोलिस निरीक्षक शिंदे हे करित आहेत.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड








www.surajyadigital.com । गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३५७ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


# सरकारची खरडपट्टी

# हे एन्काउंटर असू शकत नाही; वकिलांवर प्रश्नांचा भडिमार

✔ मुंबई/प्रतिनिधी

**बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटरमध्ये मृत्यू झाला. हे एन्काउंटर आता वादग्रस्त ठरले असून कोर्टानेही यावरून ताशेरे ओढले आहेत. एन्काउंटरचा संपूर्ण घटनाक्रमच संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. एवढेच नव्हे तर हे एन्काउंटर असूच शकत नाही, असे मुंबई हायकोर्टाने म्हटले आहे. त्यामुळे महायुतीच्या सरकार अडचणीत येण्याची चिन्हे दिसत आहेत. बुधवारच्या सुनावणीत जखमी पोलिसाचे वैद्यकीय अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आदी पुरावे सादर करण्याचे आदेशही कोर्टाने सीआयडीला दिले.**

चकमकीत मृत्यू झाल्यानंतर अक्षयचे वडील अण्णा शिंदे यांनी न्यायालयात तातडीने फौजदारी रिट याचिका केली आहे. या कथित चकमकीबरोबरच बदलापूर लैंगिक शोषणाबाबतच्या संपूर्ण प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली एसआयटी चौकशी करण्याचा आदेश देण्याची विनंतीही शिंदेंनी याचिकेत केली आहे. या याचिकेवर तातडीने सुनावणी होत आहे.

### एवढा निष्काळजीपणा का?

गंभीर गुन्हा असलेल्या माणसाला घेऊन जात असताना एवढा निष्काळजीपणा का दाखवला. याबाबत नियमावली काय आहे? त्याच्या हाताला बेड्या होत्या का? त्यावर सरकारी वकील वेनेगावकर म्हणाले, त्याच्या हाताला बेड्या होत्या. पण त्याने पाणी मागितले. याप्रकरणी न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण आणि न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

### वकिलासह पोलिसांना सुनावले

अक्षय शिंदे याने पोलीस वाहनात पोलिसांच्या हातातील बंदूक हिसकावून घेऊन पोलिसांवर गोळीबार केला, असा दावा पोलिसांकडून करण्यात येतोय. याबाबत न्यायमूर्तींनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ''पोलिसांची पिस्तुल अक्षयने कशी हिसकावली. ती आधीच लोड कशी काय होती? यावर आमचा विश्वास बसत नाही. कोणताही सामान्य माणूस पिस्तुल हिसकावून गोळी झाडू शकत नाही. कोणताही कमजोर माणूस पिस्तुल लोड करू शकत नाही. तुम्हाला पिस्तुल वापरता येते का? मी १०० वेळा तरी वापरली आहे, त्याामुळे मी हे सांगू शकतो'', अशा शब्दात न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारी वकिलांना आणि पोलिसांना सुनावले.

### चार पोलिसांना त्याला आवरता आले नाही का?

''पोलीस वाहनातून आरोपीला घेऊन जात असताना चार पोलीस अधिकाऱ्यांची गरज काय होती? यासाठी अतिरिक्त माणसांचा वापर झाला असे वाटत नाही का?'' असा सवाल कोर्टाने विचारला. तसेच ''त्याने हातातून पिस्तूल खेचून घेतली तेव्हा चार पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला रोखायला हवे होते. चार पोलिसांना तो आवरता आला नाही का?'' असाही प्रश्न कोर्टाने विचारला. अक्षयने तीन गोळ्या झाडल्या असे तुम्ही म्हणालात. एक गोळी पोलिसाला लागली. मग इतर दोन गोळ्या कुठे आहेत? आपण स्वसंरक्षणाकरता अशा परिस्थितीत पायावर किंवा हातावर गोळी मारतो. गोळी कुठे मारावी याचे प्रशिक्षण पोलिसांना दिले जाते.'' अशाही प्रश्नांची सरबत्ती केली. त्यावर सरकारी वकिलांनी सांगितले की, पोलिसांनी विचार केला नाही, त्यांनी घटनेवर तत्काळ प्रतिक्रिया दिली.




### कोर्टात नेमकं काय घडलं?

● **न्यायमूर्ती मोहिते डेरे :**

मृतदेह शवविच्छेदन अहवालासाठी केव्हा नेला? त्याचा व्हिडिओग्राफ आहे का? मृत्यूचे नेमके कारण काय? अक्षयला आणि ऑफिसरला नेमकी कोठे दुखापत झाली?

● **सरकारी वकील :**

मृतदेह सकाळी ८ वाजता जेजे रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला. शवविच्छेदनाचा व्हिडिओ रेकॉर्डिंग आहे. रक्तस्त्रावामुळे त्याचा मृत्यू झाला. डोक्यात आरपार गोळी गेली होती. पोलीस अधिकाऱ्यालाही गोळी छेदून गेली.

● **न्यायमूर्ती चव्हाण :**

फॉरेन्सिक चाचणी झाली का? ते कोणते शस्त्र होते? पिस्तुल लोड झाली होती का? त्याला पिस्तुल लोड करता येत होती का?

### हे एन्काउंटर असू शकत नाही

''त्याने जेव्हा हातात पिस्तुल घेऊन कोणावर रोखली तेव्हा इतर अधिकाऱ्यांनी त्याला रोखले का नाही. तो फार स्ट्राँग माणूस नव्हता. त्यामुळे हे स्वीकारणे कठीण आहे. हे एन्काऊंटर असू शकत नाही'', असेही न्यायमूर्ती म्हणाले. त्याने यापूर्वी कधी शस्त्रे वापरली आहेत का? जर त्याने पिस्तुल लोड केली असे तुम्ही म्हणत असाल तर त्याने याआधी शस्त्रे वापरली असतील, असेही न्यायमूर्तींनी विचारले. त्यावर सरकारी वकील म्हणाले, त्याने पिस्तुल लोड केली नाही. झटापटीत पिस्तुल लोड झाली होती. त्याने याआधी कधीही शस्त्रे वापरली नाहीत.

### आमचा विश्वास बसत नाही

न्यायमूर्ती चव्हाण ''पोलिसांची पिस्तुल अक्षयने कशी हिसकावली. ती आधीच लोड कशी काय होती? यावर आमचा विश्वास बसत नाही. कोणताही सामान्य माणूस पिस्तुल हिसकावून गोळी झाडू शकत नाही. तुम्हाला पिस्तुल वापरता येते का? मी १०० वेळा तरी वापरली आहे, त्यामुळे मी हे सांगू शकतो.त्याने जेव्हा हातात पिस्तुल घेऊन कोणावर रोखली तेव्हा इतर अधिकाऱ्यांनी त्याला रोखले का नाही. तो फार स्ट्राँग माणूस नव्हता. त्यामुळे हे स्वीकारणे कठीण आहे. हे एन्काऊंटर असू शकत नाही, असेही न्यायमूर्ती म्हणाले.

### जखमी पोलिसाचे वैद्यकीय अहवाल द्या

याप्रकरणातील जखमी झालेल्या पोलीस अधिकाऱ्याचे वैद्यकीय अहवालही कोर्टाने मागितले आहेत. तसेच, अक्षयने विशिष्ट अतंराने गोळीबार केला की पॉइंट ब्लँक रेंज गोळीबार केला याचा फॉरेन्सिक अहवालही कोर्टाने मागवला आहे. तसेच, एका बाजूला गोळी लागून ती दुसऱ्या बाजूला कुठे गेली असा सवालही त्यांनी विचारला. याप्रकरणी पुढच्या गुरुवारी सुनावणी होणार आहे.




**सोलापूर : सोलापूर स्थानकावर उतरलेल्या प्रवाशांना विजयपूरला जाण्यासाठी स्थानकात एस.टी. बसची सोय करण्यात आली होती.**

## लच्याण-तडवळ स्थानकादरम्यान मालगाडी घसरली

### विजयपूरला जाणाऱ्या प्रवाशांना सोलापुरात थांबवले

✔ **सोलापूर :** लच्याण-तडवळ स्थानकाजवळ बुधवारी मालगाडी घसरल्याने विजापूरसह हुबळीला जाणाऱ्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे प्रवाशांची मोठी अडचण झाली. सोलापूर स्थानकावर प्रवाशांना उतरवण्यात आले. त्यामुळे स्थानकावर मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे एस.टी. रेल्वेस्थानकातून त्याद्वारे प्रवाशांना पुढील मार्गाला सोडण्यात आले.

लच्याण-तडवळ स्थानकाजवळ मालगाडी घसरल्याने विजयापूरला जाणाऱ्या गाड्यांनी सोलापूर स्थानकात थांबा घेतला.

यामुळे अनेक गाड्या रद्द करण्यात तर काही धावणाऱ्या गाड्यांचा मार्ग बदलण्यात आला आहे. सोलापूर स्थानकावर प्रवाशांची गर्दी झाल्याने त्यांच्या सोयीसाठी सोलापूर रेल्वे विभागाने सेवा उपलब्ध करुन दिल्या होत्या. प्रवाशांना नाश्त्याची सुविधा पुरवण्यात आली होती. तसेच सोलापूरहून हॉस्पेट, विजयपूरकडे जाणाऱ्या प्रवाश्यांसाठी ६ बस सोय करून देण्यात आली होती. सोलापूरच्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी स्थानकाबाहेर बस उपलब्ध करून देण्यात आल्या यामुळे स्थानकाबाहेर प्रवाशांनी गर्दी पाहायला मिळाली होती.

## गुरसाळे ब्रिज येथे ४५ हजारांचे साहित्य पळवले

✔ **पंढरपूर :** गुरसाळे (ता.पंढरपूर) येथील बायपास रोडवर चालू असलेल्या ब्रिजच्या कामावरील ४५ हजार रुपये किमतीचे लोखंडी साहित्य चोरट्याने पळवले. ही चोरी रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. या संदर्भात प्रल्हाद डाकेवार (रा. नांदेड सध्या रा.पंढरपूर) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. चोरट्यानी शनिवारी मध्यरात्रीनंतर गुरसाळे येथील ब्रिजच्या खाली ठेवलेले लोखंडी रॉड, बार आदी साहित्य (९०० किलो) चोरून नेले.असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार सय्यद करीत आहेत.

## जरांगेंपाठोपाठ हाके यांनीही उपोषण मागे घेतले

✔ जालना/प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या पाठोपाठ लक्ष्मण हाके यांनीही आपले उपोषण मागे घेतले आहे. जरांगे यांनी नवव्या तर हाके यांनी सातव्या दिवशी उपोष मागे घेतले.

जरांगे यांनी सलाईन लावून उपोषण आवडत नाही म्हणत त्यांनी उपोषण मागे घेतले. ते आता उपाचारासाठी संभाजीनगर येथे रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी उपोषण स्थगित केल्याची घोषणा करताच अंतरवालीत आलेल्या मराठा आंदोलकांनी एकच जल्लोष केला आहे. दरम्यान, जरांगे पाटील यांचा डाव आम्ही यशस्वी होऊ दिला नाही, असा दावा ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केला. हाके हे देखील जरांगे उपोषण करत असलेल्या अंतरवाली सराटीपासून जवळील वडगोद्री येथे उपोषण करत होते. त्यांनीही उपोषण स्थगित केले आहे. ओबीसी महिला आणि मुलींच्या हाताने पाणी घेऊन हाकेंनी उपोषण सोडले आहे.



### त्याच वेशीत घोडे अडवले : हाके

आम्ही शासनाला रोखले आणि जिथून या आंदोलनाची सुरुवात झाली, ज्या बेकायदा मागण्याला सुरुवात झाली, त्याच वेशीत जरांगे पाटील नावाचे घोडे आम्ही अडवले आणि असे तसे नाही, तर ते जागेवर थांबवलं.' असे हाके म्हणाले.

## अतिक्रमण केल्याचा जाब विचारल्याने माय-लेकाला मारहाण

### दोघांविरूध्द गुन्हा दाखल

✔ सोलापूर/प्रतिनिधी

शुक्रवार पेठेत प्लॉटवर अतिक्रमण केल्याचा जाब विचारण्यास गेलेल्या मायलेकाला शिवीगाळ करून केल्याप्रकरणी प्रभाकर जयकुमार कुसुमकर व अमर प्रभाकर कुसुमकर दोघे (रा. शुक्रवार पेठ) या दोघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी भारती प्रकाश कांबळे (वय ४५ रा. ढोर गल्ली, शुक्रवार पेठ) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

२१ सप्टेंबर रोजी भारती कांबळे यांच्या जागेत कुसुमकर पिता-पुत्रांनी पत्राशेड मारून अतिक्रमण केले होते. ते पाहण्यासाठी भारती कांबळे, त्यांचे पती प्रकाश, मुलगा किरण, दिपक, पुतण्या दिलीप व त्याची पत्नी वंदना, चुलत सून माधवी व इतर गेले. त्यावेळी प्रभाकर कुसुमकर व अमर कुसुमकर या दोघांनी त्यांना शिवीगाळ केली. भारती कांबळे व त्यांचा मुलगा किरण यांना लाकडी फळीने मारहाण केली. तपास हवालदार पवार हे करित आहेत.

## पाटकूल येथे ताप आल्याने दोन वर्षीय बालिका दगावली

✔ **सोलापूर :** ताप आल्याने दोन वर्षीय बालिका उपचारास दाखल करण्यापूर्वी मयत झाली . ही घटना पाटकुल (ता . मोहोळ) येथे बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

विश्वजा किरण राऊत (वय २ वर्षे, रा.पाटकुल) असे मयत झालेल्या बालिकेचे नाव आहे. तिला काल मंगळवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास ताप आला होता. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने तिचे वडील (किरण राऊत) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पहाटे अडीच वाजता दाखल केले होते. मात्र ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अब मुंबई दूर नही!!!


कल्याण
247-34-248

मुंबई
256-38-459


# सोलापूर विमानतळाला डीजीसीएकडून लायसन्स मंजूर

## विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही लवकरच : जिल्हाधिकारी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डिजीसीए) विमान उडणे व उतरण्याचे परवाना (लायसन्स) मंजूर झाल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

दिनांक ११ व १२ सप्टेंबर रोजी डीजीसीएच्या पथकाने सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने विमानतळाची पाहणी व तपासणी केली होती. यामध्ये विमानतळाचे नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणालीद्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी डीजीसीए कडून करण्यात आलेली होती. विमान वाहतूक सुरू करण्याच्या अनुषंगाने असलेली सर्व मानके सोलापूर विमानतळ प्राधिकरण कडून पूर्ण करण्यात आल्यामुळे बुधवारी डीजीसीए कडून सोलापूर विमानतळावरून विमान उडणे व उतरण्याचे परवाना (लायसन्स) मंजूर झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.




तत्पूर्वी ब्युरो ऑफ सिविल एव्हिजन सिक्युरिटी (नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो) च्या अधिकाऱ्यांनी होटगी रोड सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध पातळींवर काटेकोरपणे तपासणी केली. विमानतळ प्राधिकरण कडून सुरक्षेच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर पुन्हा ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटी चे अधिकारी तपासणीसाठी आले होते. त्यांची तपासणी झाल्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम विमानतळाच्या विविध सुरक्षा मानके याबाबत तपासणी करण्यासाठी आली होती. तपासण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीजीसीए कडून सोलापूर विमानतळाला विमान लँड होणे को टेकऑफ करण्याची लायसन्स प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

### मोदींच्या हस्ते आज होणार उद्घाटन



✔ **सोलापूर :** बहुचर्चित सोलापूर विमानतळाचे उद्घाटन २६ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे येथून दूरदृश्य प्रणाली द्वारे होणार आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळावर नव्याने करण्यात आलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदूने, विमानतळ प्राधिकरणचे बनोथ चांप्ला त्यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळ प्राधिकरणाने केलेल्या तयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.